महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २७ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १८१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### महापालिका निवडणुकीत स्वबळ की युती-आघाडी?

### राजकीय पेच आणि लोकशाहीचा कस

राजकीय पेच आणि लोकशाहीचा कस आगामी महापालिका निवडणुका जवळ येत असताना सर्वच राजकीय पक्षांसमोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा आहे—स्वबळावर निवडणूक लढवायची की युती-आघाडीचा मार्ग स्वीकारायचा? हा प्रश्न केवळ जागावाटपापुरता मर्यादित नसून, तो पक्षाची विचारधारा, नेतृत्वाची ताकद, स्थानिक कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास आणि मतदारांचा विश्वास यांचा कस पाहणारा आहे. स्वबळावर निवडणूक लढवणे म्हणजे पक्षाची खरी ताकद जनतेसमोर मांडण्याची संधी. स्थानिक प्रश्नांवर स्पष्ट भूमिका, स्वतंत्र जाहीरनामा आणि एकसंध नेतृत्व ही त्याची जमेची बाजू. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण होतो, नेतृत्व घडते आणि मतदारांना 'कोण जबाबदार?' हा प्रश्न स्पष्टपणे विचारता येतो. मात्र, मतविभाजनाचा धोका, संसाधनांची कमतरता आणि सत्तेपासून दूर राहण्याची शक्यता ही आव्हाने कायम राहतात. दुसरीकडे, युती-आघाडी म्हणजे गणिती राजकारण. मतांचे एकत्रीकरण, संसाधनांची वाटणी आणि सत्तास्थापनाची शक्यता वाढते. विशेषतः बहुपक्षीय शहरी राजकारणात युती उपयोगी ठरू शकते. परंतु विचारधारांतील विसंगती, जागावाटपाचे वाद, कार्यकर्त्यांचा गोंधळ आणि सत्तेनंतरची अंतर्गत कलह ही त्याची मर्यादा ठरते. अनेकदा 'सत्ता मिळाली, पण दिशा हरवली' अशी अवस्था दिसून येते. खरा मुद्दा असा की महापालिका निवडणुका या स्थानिक स्वराज्याच्या कणा आहेत. पाणी, रस्ते, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर कोण सक्षम आहे, हे मतदार पाहतात. त्यामुळे स्वबळ असो वा युती—निवड केवळ राजकीय सोयीने नव्हे, तर लोकहिताच्या स्पष्ट अजेंड्यावर व्हायला हवी. अखेरीस, मतदारही आता प्रगल्भ झाले आहेत. केवळ चिन्ह किंवा युतीपेक्षा काम, प्रामाणिकपणा आणि उत्तरदायित्व यांना ते महत्त्व देतात. म्हणूनच महापालिका निवडणुकीत खरा विजय युतीचा किंवा स्वबळाचा नसून, लोकशाही मूल्यांचा असायला हवा. कोणता मार्ग निवडायचा, हे पक्षांनी ठरवावे—पण निर्णयाच्या केंद्रस्थानी शहराचा विकास आणि नागरिकांचे हित असणे हीच काळाची गरज आहे.

# निवडणूक नको, आधी हक्क द्या!

## पालिका निवडणुकींच्या तोंडावर २७ गाव सर्वपक्षीय समिती आक्रमक !



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली:** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील समाविष्ट २७ गावांच्या प्रश्नांकडे वर्षानुवर्षे होत असलेल्या दुर्लक्षाविरोधात आता थेट राजकीय संघर्ष उभा राहण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. केडीएमसीतील २७ गाव सर्वपक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने आगामी महापालिका निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याने, निवडणूकपूर्व राजकारण चांगलेच तापले आहे. डोंबिवली येथे पार पडलेल्या समितीच्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा निर्णय एकमताने जाहीर करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी स्पष्ट भूमिका मांडत सांगितले की, २७ गावांतील नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर सातत्याने गदा आणली जात असून, केवळ निवडणुकीपुरती आश्वासने देऊन राजकीय पक्षांनी या गावांची फसवणूक केली आहे. त्यामुळे यापुढे कोणत्याही पक्षाच्या नेत्यांना अथवा इच्छुक उमेदवारांना २७ गावांत राजकीय प्रवेश दिला जाणार नाही, असा ठाम इशारा देण्यात आला. समितीने सर्व राजकीय पक्ष व इच्छुक उमेदवारांना थेट आव्हान देत म्हटले आहे की, या भूमिकेकडे दुर्लक्ष करून कोणी उमेदवार निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्याविरोधात संघर्ष समिती आक्रमक भूमिका घेईल. गरज पडल्यास आंदोलन, जाब विचारणा आणि लोकशक्तीच्या माध्यमातून विरोध दर्शविला जाईल, असेही बैठकीत ठणकावून सांगण्यात आले. पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, मालमत्ता कर, गावठाण हक्क, विकास आराखडा तसेच मूलभूत नागरी सुविधांच्या प्रश्नांवर आजही २७ गावांना न्याय मिळालेला नाही. महापालिका प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांनी जाणीवपूर्वक या गावांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. नागरिकांच्या संयमाचा बांध फुटला असून, हा निर्णय केवळ इशारा नसून थेट संघर्षाची राजकीय घोषणा असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले. २७ गाव सर्वपक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीच्या या निर्णायक भूमिकेमुळे आगामी केडीएमसी निवडणूक प्रक्रियाच अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली असून, सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांवरही मोठा राजकीय दबाव निर्माण झाला आहे.

# अंबरनाथ : म्हाडाच्या पाच भूखंडाची विक्री ?

## महसूल उभा करण्यासाठी तोट्यातील भूखंड विक्रीच्या हालचाली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** मुंबईबाहेर एमएमआर क्षेत्रात म्हाडाच्या कोकण मंडळाकडून मोठ्या प्रमाणात घरे उभारली जात असली तरी मोजक्या ठिकाणच्या घरांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे ज्या ठिकाणच्या घरांना फारसा प्रतिसाद मिळत नाही, कनेक्टिव्हिटीच्यादृष्टीने गैरसोय आहे अशा ठिकाणच्या भूखंडाची विक्री करून महसूल उभा करण्याच्या हालचाली म्हाडाने सुरू केल्या आहेत. त्याचाच भाग म्हणून म्हाडा अंबरनाथ येथील पाच भूखंडाची विक्री करून महसूल उभा करणार आहे. त्यासाठीच्या निविदा आचारसंहितेनंतर कोकण मंडळाकडून काढल्या जाणार आहेत.

म्हाडाच्या कोकण मंडळाचे ठाणे, कल्याण, अंबरनाथ, खोनी, शिरढोन अशा वेगवेगळ्या ठिकाणी भूखंड असून त्यावर परवडणारी घरे उभारून त्याची लॉटरीद्वारे विक्री केली जाते. मात्र अनेक ठिकाणचे भूखंड रेल्वे स्थानक किंवा मूळ शहरापासून दूर असल्याने त्या ठिकाणी जाण्यासाठी वाहतुकीची पुरेशी साधने उपलब्ध नाहीत, पायाभूत सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे अशा ठिकाणी घरे उभरल्या त्याला फारसी मागणी नसते.

# ८३ जागा आणि महापौर पद ! - तरच युती!

## माजी आमदार नरेंद्र पवार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण -** कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत भाजपने स्वयंयंत्रणा राबवून केलेल्या सर्वेक्षणात भाजपला ८० हून अधिक जागा मिळण्याची शक्यता आहे. कल्याण डोंबिवलीतील भाजपची ताकद वाढली आहे. त्यामुळे १२२ पैकी ८३ हून अधिक जागा भाजपसाठी सोडण्याची तयारी आणि पाच वर्ष भाजपकडेच महापौरपद सोडण्याची हमी शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाने दिली तरच पालिकेत शिवसेना शिंदे गट आणि भाजपची युती शक्य आहे. अन्यथा, आमचा मार्ग मोकळा आहे, अशा स्पष्ट शब्दात भाजपचे कल्याणचे माजी आमदार आणि महायुती समन्वय समिती सदस्य नरेंद्र पवार यांनी आपली भूमिका माध्यमांसमोर शुक्रवारी मांडली.

दरम्यान, पोलिसांच्या गोपनीय अहवालांमध्ये भाजप कल्याण डोंबिवली शहरांमध्ये आघाडीवर असल्याची चर्चा आहे. या सर्व संधीचा फायदा घेत भाजपने कल्याण डोंबिवली पालिका निवडणुकीसाठी स्वबळाचा नारा पक्का केला आहे. स्वबळावरच पालिका निवडणूक लढवू या विषयी भाजप कार्यकर्ते आक्रमक आहेत.

कल्याण डोंबिवली पालिका निवडणूक होऊन दहा वर्ष उलटली आहेत. आता नागरिक काम करणाऱ्या कार्यकर्ते, पदाधिकारी यांना ओळखत आहेत. मी या प्रभागाचा माजी नगरसेवक ही ओळख मागच्या दहा वर्षात पुसली गेली आहे. आता काम करतो तो लोकांच्या मनात आहे. हा कार्यकर्ता कोण आहे हे लोक ओळखत आहेत. या सर्व राजकीय गोष्टींचा विचार केला तर राजकीय गणिते आता पूर्वीसारखी राहिली नाहीत. यापूर्वीचे शिवसेनेचे संख्याबळ अधिक होते. शिवसेना फुटल्यानंतर नगरसेवक, त्यांच्या शक्तीचे विभाजन झाले आहे. या पार्श्वभूमीवर भाजप एकसंध आहे. मागील पाच वर्षात भाजपची ताकद वाढली आहे, असे पवार यांनी सांगितले.

|शिवसेनेचे जागा वाटपाचे गणिती सूत्र आम्हाला अजिबात मान्य नाही. भाजपने तयार केलेला जागा वाटपाचे गणित आताच्या राजकीय परिस्थितीवर आहे. शिवसेनेने ते मान्य करावे. तसे नसेल तर भाजपचा मार्ग पूर्ण मोकळा असेल, असे पवार यांनी स्पष्ट केले. भाजपच्या खासगी सर्वेक्षणात भाजपला कल्याण डोंबिवलीत एकूण ८० हून अधिक जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे ८३ हून अधिक जागा आम्हाला मिळाल्याच पाहिजेत.

पालिकेत अनेक वेळा संधी असुनही आम्हाला महापौर पदावर पाणी सोडावे लागले. सहसाथीदार असुनही कधीही शिवसेनेने आमचा महापौर पदासाठी विचार केला नाही. राजकीय वाद टाळण्यासाठी भाजपने ते यापूर्वी सहन केले. आता तसे होणार नाही, असे पवार यांनी रोखठोक बाण्याने स्पष्ट केले.

युती होऊ नये अशी दोन्हीकडील कार्यकर्त्यांची भावना आहे. अशा कार्यकर्त्यांची समजूत काढणे दोन्ही कडील पक्ष नेत्यांना अवघड आहे. युतीचा निर्णय स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांच्या मतांवर घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या मताचा आदर शिवसेना, भाजप नेत्यांनी केला पाहिजे आणि आपला शब्द पाळला पाहिजे, अशी कार्यकर्त्यांची भावना आहे, असे नरेंद्र पवार यांनी सांगितले

# ठाकरे बंधूंच्या जागा वाटपाचे सूत्र ठरले

## कल्याण डोंबिवली मनपाच्या १२२ जागांचे सामंजस्याने वाटप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**


**कल्याण - ठाणे जिल्ह्यातील महायुतीमध्ये पालिकेतील जागा वाटपांवरून भिजत घोंगडे पडले आहे. इतर पक्षांचा जागा वाटपांबाबत ताळमेळ नाही. अशी ताणाताणी प्रमुख आणि इतर पक्षांमध्ये सुरू असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्यांनी कल्याण डोंबिवली पालिकेसाठीचे १२२ जागांवरील आपले जागा वाटप सामंजस्याने निश्चित केले आहे. ५५ जागांवर मनसे, ६७ जागांवर उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि त्यांचे मित्र लढतील, अशी माहिती मनसेचे नेते आणि कल्याण ग्रामीणचे माजी आमदार राजू पाटील यांनी माध्यमांना दिली.**




दरम्यान, कोणत्याही प्रकारचा वाद न घालता, घासाघीस न करता चांगल्या मनाने हे वाटप झाले आहे. काँग्रेस जरी पालिकेत लढली तरी भाजपला फायदा म्हणून त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची कृती होणार नाही. त्यामुळे सकारात्मक विचाराने ते ही पालिका निवडणूक लढवतील, असा विश्वास आहे. असे सांगत काँग्रेसचे पदाधिकारी आपल्या भेटीला येऊन गेले होते. त्यांनी निवडणूक लढविण्याची तयारी केली आहे. ठाकरे पक्ष आणि त्यांचे मित्र पक्ष उर्वरित ६७ जागांबाबत ठरवतील, असे राजू पाटील यांनी सांगितले.

## महत्वाचे



आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या निर्देशानुसार

### उल्हासनगर मनपा कर्मचा-यांना निवडणूक खर्चाबाबत प्रशिक्षण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी/दि. २६ डिसेंबर**

राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना व मा. आयुक्त श्रीमती मनीषा आव्हाळे यांच्या निर्देशानुसार निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या सर्व पथकांना उमेदवारांच्या निवडणूक खर्चाबाबतचे प्रशिक्षण जनरल अरुणकुमार वैद्य टाऊन हॉल येथे देण्यात आले. यावेळी निवडणुकीसाठी नेमलेल्या खर्च विषयक टीम, भरारी पथके, स्थिर सर्वेक्षण चमू, व्हिडिओ सर्वेक्षण चमू, व्हिडिओ पाहणारे चमू मधील सर्व कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांना खर्च सनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी श्री किरण भिलारे, मुख्य लेखा अधिकारी व श्री अभिजित पिसाळ, मुख्य लेखा परीक्षक यांनी दिले. याप्रसंगी उपायुक्त श्रीमती करपे, उपायुक्त श्रीमती चौगले व भांडार प्रमुख श्री अंकुश कदम उपस्थित होते महानगर पालिका निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाच्या खर्च विषयक तरतूदींबाबत सर्वांना मार्गदर्शन करण्यात आले व त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

### भिवंडीत 13 हजार 179 एक सारखेच मतदार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, ता. २६ :** लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर दुबार मतदारांचा विषय चांगलाच गाजत आहे. त्यात आगामी महापलिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी दुबार मतदारवरून रान पेटविले आहे. आता महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दुबार मतदारांचा विषय ऐरणीवर आल्यानंतर, भिवंडी महापलिका क्षेत्रातील पाच प्रभाग समितीमध्ये १३ हजार १७९ मतदार यांचे फोटो आणि नाव एकसारखी असल्याची बाब समोर आली आहे. या दुबार मतदारांना मतदानापासून रोखण्यासाठी महापालिकेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार दोन ठिकाणी नावे असलेल्या मतदारांनी त्यांना कोणत्या ठिकाणी मतदान करायचे आहे, त्यासंदर्भातील अर्ज भरून द्यावा लागणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

# राष्ट्रवादीतही स्वबळाचा नारा

## कॉंग्रेस पाठोपाठ अजित दादाही वेगळी चूल मांडणार?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

राजकीय गोटातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. भाजपसह शिंदेसेनेशी सूर न जुळल्याने महापालिका निवडणुकीत दादा गटाने एकला चलो रे चा निर्णय घेतल्याची माहिती समोर येत आहे. नैसर्गिक युतीचा घटक नसल्याने अजितदादांच्या राष्ट्रवादी एकटी पडल्याचे चित्र आहे.अजित पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस अनेक महापालिका युती सोबत न जाता स्वतंत्र निवडणूक लढवण्याचे जवळपास निश्चित झाल्याची माहिती समोर येत आहे.

> **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार सुनिल तटकरे यांच्या सोबत चर्चा नंतरच अजित पवार स्वतंत्र निवडणूक लढवण्याचा अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे समजते. तरएनसीपी अजित पवार यांनी मनपात स्थानिक पातळींवर कोणासोबत जावे याचा निर्णय घ्यायचा पण शक्यतो कॉंग्रेस सोडून मित्र पक्ष करावे असा भाजपा नेत्यांचे मत असल्याचे समजते. त्यामुळे अनेक महापालिकेत आता राष्ट्रवादीला समविचारी पक्षांची मोट बांधावी लागणार आहे. मुंबई महापालिकेत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे महाविकास आघाडीसोबत सुर जुळले नाही तर पुणे, पिंपरी पाठापोठ राज्यातील इतर महापालिकेत कदाचित दोन्ही राष्ट्रवादी एकत्र दिसण्याची एक शक्यताही वर्तवण्यात येत आहे.**

त्यामुळे अनेक ठिकाणी महायुतीविरुद्ध अजितदादांची राष्ट्रवादी असा सामना रंगण्याची शक्यता आहे. तर काही ठिकाणी महायुतीच्या उमेदवारांना दादांच्या राष्ट्रवादीचे बळ मिळणार नसल्याचे स्पष्ट होत आहे. या महापालिकेत दादांची राष्ट्रवादी स्वबळावर निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून बाहेर पडलेले प्रकाश महाजन यांचा शिवसेनेत प्रवेश



**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून बाहेर पडलेले प्रकाश महाजन यांनी आज ठाण्यातत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. आपण पद किंवा उमेदवारीसाठी कोणतीही मागणी न करता शिवसेनेत प्रवेश केला असल्याचं महाजन यांनी बातमीदाराशी बोलताना सांगितलं. ते शिवसेनेचे प्रवक्ते असतील, असं शिंदे यांनी सांगितलं.**





# सांस्कृतिक महोत्सवामुळे विद्यार्थ्यांना नवी उर्जा मिळते : उपायुक्त सचिन सांगळे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (25) :** एरव्ही शाळेच्या गणवेषात असलेली मुले सांस्कृतिक महोत्सवानिमित्त विविध वेशभूषेमध्ये नटलेली पाहून मला माझे बालपणीचे दिवस आठवले. वर्षभर अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक महोत्सवाची आवश्यकता आहे, अशा महोत्सवांमुळे विद्यार्थ्यांचा ताणतणाव कमी होऊन त्यांना नवी उर्जा मिळते, नवे मार्ग सापडतात. त्याचबरोबर कलाही जोपासले जात असल्याचे मत शिक्षण विभागाचे उपायुक्त सचिन सांगळे यांनी मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्धाटनप्रसंगी व्यक्त केले.



ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव व स्पर्धा 23 व 24 डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. या महोत्सवाचे उद्धाटन समारंभ 23 डिसेंबर रोजी सकाळी 11 वाजता ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 23 किसन नगर येथे झाले. यावेळी उपायुक्त सचिन सांगळे, प्रभारी शिक्षणाधिकारी शेषराव बडे, गटाधिकारी संगीता बामणे या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी सांस्कृतिक महोत्सवाच्या कार्याध्यक्ष सविता चौधरी व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

सलग दोन दिवस सुरू असलेल्या या सांस्कृतिक महोत्सवांमध्ये नृत्य आणि नाट्य विभाग अशा दोन प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. नृत्य विभागात इयत्ता पहिली ते पाचवीच्या एकूण 30, इयत्ता सहावी ते आठवीच्या एकूण 46 शाळांनी तर नाट्य विभागांमध्ये 26 अशा एकूण 102 शाळांमधील एकूण 2000 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. महोत्सवामध्ये इयत्ता पहिली ते पाचवी पूर्व प्राथमिक आणि इयत्ता सहावी ते आठवी उच्च प्राथमिक अशा दोन विभागांमध्ये नृत्य स्पर्धा तसेच इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी नाट्य स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा अनुक्रमे ठाणे मनपा शाळा क्रमांक 13 खोपट, ठाणे मनपा शाळा क्रमांक 23 किसननगर, आणि ठाणे मनपा शिक्षण विभाग कार्यालय तळमजला हॉल विष्णुनगर, नौपाडा या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या उद्धाटन प्रसंगी ठाणे मनपा शाळा क्रमांक 120 या शाळेचे शिवशंभू गीत सादर करण्यात आले. या सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेतील सर्व कार्यक्रमांचे विभागवार परीक्षण होऊन नृत्य, नाट्य विभागातून बक्षीस पात्र कार्यक्रम निवडण्यात आले असून त्यांचे सादरीकरण मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सवात होणार आहे. या संपूर्ण महोत्सवाचे आयोजन आणि नियोजन सांस्कृतिक समिती 2025 - 26 ने अतिशय नेटकेपणाने केले होते. त्यामुळे एकाच वेळेस तीन ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धा उत्तमरीत्या पार पडल्या.

स्पर्धेचा निकाल - इ.1 ते 5 नृत्य स्पर्धा : प्रथम क्रमांक- शाळा क्रमांक 53, द्वितीय क्रमांक- शा.क्र 56, तृतीय क्रमांक- शा.क्र 64, उत्तेजनार्थ 1 -शा.क्र 96, उत्तेजनार्थ 2 -शा.क्र 26

इ. 6 ते 8 नृत्य स्पर्धा निकाल - प्रथम क्रमांक- शा.क्र 59, द्वितीय क्रमांक- शा.क्र 18, तृतीय क्रमांक- शा.क्र 25, उत्तेजनार्थ 1- शा.क्र 102, उत्तेजनार्थ 2 -शा.क्र 22

इ.1 ते 8 वी नाट्यस्पर्धा निकाल - प्रथम क्रमांक- शा.क्र 11, द्वितीय क्रमांक- शा.क्र 14, तृतीय क्रमांक- शा.क्र 6, उत्तेजनार्थ 1- शा.क्र 125, उत्तेजनार्थ 2 – शाळा क्र. 40

# ‘मिशन लक्ष्यवेध’ अंतर्गत इच्छुक प्रशिक्षकांना 31 डिसेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मिशन लक्ष्यवेध या राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेंतर्गत टेबल टेनिस, कुस्ती, बॅडमिंटन, ॲथलेटिक्स आणि शूटिंग या खेळांसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात क्रीडा प्रतिभा विकास केंद्र सुरू करण्यात येत आहे. यासाठी ॲथलेटिक्स, टेबल टेनिस, बॅडमिंटन, कुस्ती व शूटिंग या खेळांचे इच्छुक प्रशिक्षक (एनआयएस / लेव्हल कोर्स व आवश्यक प्रमाणपत्रधारक) यांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

तसेच, एखादी संस्था आपल्या संस्थेमध्ये हे केंद्र चालविण्यास इच्छुक असल्यास त्यांनी तात्काळ अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

ऑलिम्पिक व जागतिक स्तरावरील स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील खेळाडूंना यशस्वी करण्याच्या उद्देशाने राज्यभर त्रिस्तरीय क्रीडा प्रशिक्षण व्यवस्था उभारण्यात येत आहे. यामध्ये राज्यस्तरावर हाय परफॉर्मन्स सेंटर, विभागीय स्तरावर स्पोर्ट्स एक्सलन्स सेंटर आणि जिल्हास्तरावर क्रीडा प्रतिभा विकास केंद्र स्थापन करण्यात येत आहेत. या केंद्रांमध्ये प्रत्येक खेळासाठी मर्यादित २० खेळाडूंची निवड करण्यात येणार असून, त्यांना तज्ज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, अत्याधुनिक क्रीडा साहित्य, स्पोर्ट्स सायन्स सुविधा, वैद्यकीय उपचार, विमा संरक्षण, पूरक आहार तसेच देशांतर्गत स्पर्धांचा खर्च शासनामार्फत देण्यात येणार असल्याचे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# दि.बा.पाटील यांच्या नावासाठी भिवंडीत गावोगावी भूमीपुत्रांचे आंदोलन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अनगाव :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव मिळावे अशी मागणी भूमिपुत्रांसह भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी लावून धरली आहे. यासंदर्भात खासदार बाळ्या मामा यांच्या नेतृत्वाखाली २२ ते २४ डिसेंबर पर्यंत भिवंडी ते नवी मुंबई विमानतळावर पायी दिंडी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र महापालिका निवडणुकीच्या आचारसंहितेचे कारण दाखवत पोलिसांनी या दिंडी मोर्चाला परवानगी नाकारली असल्याने हे आंदोलन स्थगित करण्यात आले .

२५ डिसेंबर पासून नवी मुंबई विमानतळावरून विमान सेवा सुरू करण्यात आली असल्याने दि.बा. पाटील यांचे नाव न देताच विमानतळ सुरू केल्याच्या निषेधार्थ खासदारांनी केलेल्या आवाहनानुसार भिवंडीतील ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये स्थानिक भूमिपुत्रांनी एकत्र येत केंद्र शासनाचा निषेध करत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव लवकरात लवकर द्यावे अशी मागणी केली .

# अटल बिहारी वाजपेयी जयंती दिनी महानगरपालिकेतर्फे अभिवादन


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी जयंती दिनी आज महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. या समयी उपस्थित अति.आयुक्त योगेश गोडसे, उपायुक्त समीर भूमकर, महापालिका सचिव किशोर शेळके, लेखा अधिकारी राजू दराडे, माहिती व जनसंपर्क अधिकारी



माधवी पोफळे, सहा.जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत, सुरक्षा अधिकारी भरत बुळे व इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन अभिवादन केले.

# भिवंडीत अय्यपा महापूजा संपन्न



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरातील पद्मानगर वऱ्हाळ देवी रोड येथील स्वामी अय्यपा मंदिर येथे ४४ व्या वार्षिक महापुजेचे आयोजन मंदिर समितीचे अध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या उपस्थितीत समिती सदस्यांनी केले होते.गुरुस्वामी सुरेश महाराज यांच्या मार्गदर्शना खाली सकाळ पासून मंदिरात गणेश पूजा,दिपाराधना अर्चन पूजा,श्री सत्यनारायण पूजा व भजन या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो नागरिकांनी मंदिरात दर्शना व महा अन्नदान प्रसादाचा लाभ घेण्या साठी उपस्थिती दर्शविली.कार्यक्रमास यशस्वी होण्यासाठी मंदिर समिती सदस्यांनी अथक मेहनत घेतली.

# कळंबुसरेच्या नंदकुमार तांडेलचा लंडनमध्ये सन्मान




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** संघर्ष, जबाबदाऱ्या आणि कठीण परिस्थितीवर मात करत आपल्या कर्तृत्वाचा ठसा थेट आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटवणारी यशोगाथा कळंबुसरे गावासाठी अभिमानाची ठरत आहे. रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील कळंबुसरे गावाचे सुपुत्र नंदकुमार अंकुश तांडेल यांना कोटक महिंद्रा, पनवेल शाखेत अव्वल कामगिरी केल्याबद्दल परदेशात लंडन येथे आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

एक सामान्य कुटुंबात जन्म, लहान वयात वडिलांचे छत्र हरपणे, त्यानंतर ऐन तरुण अवस्थेत मोठ्या भावाचेही निधन अशा कठीण प्रसंगांतून जात असतानाही वृद्ध आईची सेवा, वहिनी-पुतणीची जबाबदारी, पत्नी आणि दोन मुलांसह स्वतःच्या कुटुंबाचा सांभाळ करत त्यांनी आपल्या मेहनतीला कधीही थांबू दिले नाही.

गेल्या तीन वर्षांपासून कोटक महिंद्रा मध्ये कार्यरत असलेल्या नंदकुमार तांडेल यांनी ग्राहकांना कर्ज सुविधा, डिजिटल सेवा, विमा सेवा, म्युच्युअल फंड सेवा आदी विविध बँकिंग सेवा प्रभावीपणे पुरवत उत्कृष्ट कामगिरी बजावली. कठोर परिश्रम, कामावरील श्रद्धा आणि सातत्यपूर्ण कार्यशैली यामुळेच त्यांची निवड या आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी करण्यात आली. या गौरवामुळे कळंबुसरे गावासह संपूर्ण रायगड जिल्ह्याचे नाव सातासमुद्रापार पोहोचले असून सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. विशेष म्हणजे यापूर्वीही त्यांना थायलंडमधील बँकॉक येथे दोन वेळा आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. तसेच गोवा, गुजरात, मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे आदी ठिकाणी विविध पुरस्कारांनी त्यांचा सन्मान करण्यात आला आहे.या अभिमानास्पद यशाबद्दल सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर तसेच ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातील आणखी यशासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# मोरोशी आदिवासी आश्रम शाळेतील दहावीत शिकणा-या विद्यार्थीनीची आत्महत्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** माळशेज घाटाच्या पायथ्याशी असणा-या मोरोशी अदिवासी आश्रम शाळेतील इयत्ता दहावीत शिकणारी कु.कोमल भास्कर खाकर डोंगरवाडी येथे राहत असलेल्या विद्यार्थीनीने गुरुवारी पहाटेच्या सुमारास शाळेच्या वस्तीगृहातच गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची घटना घडली असल्याने आश्रम शाळेतील विद्यार्थांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मोरोशी येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापुर अंतर्गत येणाऱ्या मुरबाड तालुक्यातील दुर्गम व निसर्गरम्य अशा माळशेज घाटाच्या पायथ्या जवळ मोरोशी येथे शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक पहिले ते बारावी पर्यंत शासकीय आश्रम शाळा आहे. या शाळेत एकूण विद्यार्थी संख्या ४०५ आहे.यात मुलांची संख्या १८१ तर मुलींची संख्या २२४ इतकी आहे,यापैकी ७३ मुली व ३० मुले आश्रम शाळेच्या वस्तीगृहात राहून आपलं शिक्षण पुर्ण करत आहेत.

मुलींचे वस्तीगृहाचे दोन रुम असुन दोन रुम मध्ये



**सदर घटनेचा पंचनामा टोकावडे पोलिसांनी केला असुन अकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून मुलीचा मृत्युदेह शविच्छेदनासाठी जे. जे. हॉस्पिटल मुंबई येथे पाठवण्यात आला असुन पुढील तपास टोकावडे पोलिस ठाण्याचे स.पो. नि.शितलकुमार नाईक हे करत आहेत.**

३२ मुली रहात असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.मात्र कोमलने कोणत्या कारणात्सव आपली जीवनयात्रा संपवली हे मात्र गुलदस्त्याच आहे.

मुरबाड तालुक्यातील आदिवासी विद्यार्थांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापुर अंतर्गत मोठ्या प्रमाणात शासकीय आश्रम शाळांचा उभारणी केली आहे.यात माळ,मोरोशी,वाल्हिवरे.,मढ.आदी ठिकाणी शासकीय आश्रम शाळा असुन मोठ्या प्रमाणात विद्यार्थी या ठिकाणी शिक्षण घेत आहेत.

## आत्महत्येचं कारण गुलदस्त्यात

टोकावडे पासुन ते माळशेज घाटाच्या पायथ्या पर्यंत मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधव रहात असल्याने तेथिल विद्यार्थाना योग्य व दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी येथे शाळांची उभारणी केली आहे.मात्र दिवसें दिवस आश्रम शाळांमधील विद्यार्थांच्या आत्महत्येचे प्रमाणामध्ये वाढ होत असल्याचे दिसत असुन विद्यार्थांच्या सुरक्षेचा प्रश्नऐरणीवर आला आहे.मागील वर्षी देखिल वाल्हीवरे आश्रमशाळेतील एका विद्यार्थांने आत्महत्या केली होती.तर बारागाव (त) या आश्रम शाळेतील विद्यार्थीच मृत्यु झाला होता. त्यामुळे आदिवासी आश्रम शाळेतीलच विद्यार्थी आत्महत्या का करतात ? याचा शोध वरिष्ठ पातळीवर घेणे गरजेचे आहे.

# श्रावणी शिंदेचे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये सुयश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण एज्युकेशन सोसायटीचे प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनियर कॉलेज पेण येथील ११ वी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी श्रावणी शिंदे हिने ५३ व्या रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शनात वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक व निबंध स्पर्धेतही द्वितीय क्रमांक पटकावला. तिने स्वतःबरोबर शाळेचे नाव उंचावले आणि संस्थेची नावे मोठे केले.

श्रावणी शिंदे ही लहानपणापासूनच हुशार आणि गुणसंपन्न असल्यामुळे इयत्ता पहिलीपासून दहावीपर्यंत सर्व विविध स्पर्धांमध्ये ती पुढेच असायची आणि आताही तीने जिल्हा विज्ञान प्रदर्शनामध्ये आपल्या अमोघ वाणीने वक्तृत्व स्पर्धेत आणि निबंध स्पर्धेमध्ये जिल्ह्यात क्रमांक पटकावला. या स्पर्धेसाठी तिला प्रा.सौ अस्मिता म्हात्रे ह्यांनी मार्गदर्शन केले.श्रावणीला मिळालेल्या यशाबदल प्राचार्य आर एम पाटील, उपप्राचार्य भांडवलकर सर व सर्व ज्युनियर कॉलेजच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

## आदिवासी विकास महामंडळाने खरेदी केलेल्या भाताचे पैसे मिळण्यासाठी

# आमदार किसन कथोरे यांना साकडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** ठाणे जिल्ह्यातील मुरबाड व शहापूर तालुक्यातील आदिवासी विभागात आदिवासी विकास महामंडळ नाशिक तर्फे धान(भात) खरेदी केले जाते खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये मुरबाड तालुक्यातील ३०७ शेतकऱ्यांचे व शहापूर तालुक्यातील २४१ शेतकऱ्यांचे असे एकूण ५४८ शेतकऱ्यांचे १२१५२ क्विंटल धानाचे २ कोटी ७९ लाख ४९ हजार ६०० रुपये शासनाकडून आदिवासी विभागाकडे जमा होते मात्र खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये शेतकऱ्यांनी सातबारावर पीक पेऱ्याची नोंद केली नसल्यामुळे भाताचे पैसे मिळाले नव्हते. यासंबंधी ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार व सामाजिक कार्यकर्ते व मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघ मुरबाडचे माजी चेअरमन प्रकाश पवार, जि प माजी सदस्य संजय पवार,अशोक पठारे यांनी आमदार किसन कथोरे यांची भेट घेऊन यासंबंधी निवेदन दिले. सुभाष पवार यांनी जिल्हाधिकारी ठाणे यांना सातबाऱ्यावर पीक पेऱ्याची नोंद शिथिल करावी यासंबंधी पाठपुरावा केला होता. जिल्हाधिकारी यांनी शहापूर व मुरबाड तहसीलदार यांना संबंधित शेतकऱ्यांनी पीक-पेरा नोंद केली नसली तरी भाताची लागवड केली आहे अशी शिफारस आदिवासी मंडळाला करावी त्याप्रमाणे शहापूर व मुरबाड तहसीलदार यांनी कार्यवाही केली आहे. शहापूर तालुक्यातील सर्व २४१ शेतकऱ्यांना भाताचे पैसे मिळणे बाकी असून आदिवासी विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक लिना बनसोड मॅडम यांच्याशी बोलून मुरबाड तालुक्यातील धसई केंद्र - ४३ माळ केंद्र-२३६ पाडगाव केंद्र-२८ असे एकूण ३०७ शेतकरी असे एकूण ५४८ शेतकऱ्यांना लवकरच पैसे मिळतील असे आमदार किसन कथोरे यांनी आश्वासन दिले आहे.




# भविष्यवेध



शनिवार
२७ डिसेंबर २०२५

**मेष**
कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना सदस्यांची नाराजी ओढवून घेऊ नका. व्यवसायानिमित्त छोटी सहल होईल. परदेशात जाण्याचे प्रयत्न करणाऱ्यांना यश मिळेल. कोणालाही पैसे उधार देणे टाळा.

**वृषभ**
जोडीदारासोबत प्रवासाचा योग आहे. करिअरच्या काळजीत असलेल्यांना नवीन नोकरीची संधी मिळेल. गुंतवणुकीचे नियम नीट समजून घ्या. वरिष्ठ आणि मित्रांचे पूर्ण सहकार्य मिळेल.

**मिथुन**
व्यावसायिकांनी सावध राहावे, चढ-उतार संभवतात. वडिलांच्या आरोग्याची काळजी घ्या. जुन्या गुंतवणुकीतून नुकसान होऊ शकते. अस्वस्थता जाणवेल.

**कर्क**
मुलांच्या भविष्यासाठी महत्त्वाच्या योजना आखाल. आर्थिक व्यवहार स्पष्ट ठेवा. घर नूतनीकरणाचे काम आज सुरू करू शकता. सुखसोयींवर खर्च होईल

**सिंह**
आज भागीदारीच्या व्यवसायातून तुम्हाला विशेष आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक मतभेद टाळण्यासाठी घरातील मोठ्या व्यक्तींचा सल्ला घेणे हिताचे ठरेल.

**कन्या**
मुलांना दिलेली आश्वासने पूर्ण केल्यामुळे घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल. जुन्या चुकांमधून धडा घेऊन भविष्यातील योजनांवर लक्ष केंद्रित करा. परोपकारी स्वभावामुळे सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

**तुळ**
आर्थिक चणचण असल्यास बँक किंवा संस्थेकडून कर्ज मिळण्याचे मार्ग मोकळे होतील. विद्यार्थ्यांनी अभ्यासात अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. लोकांच्या गैरसमजाकडे दुर्लक्ष करून ध्येयावर ठाम राहा.

**वृश्चिक**
जोडीदाराच्या खंबीर साथीमुळे भविष्यातील आर्थिक नियोजनाला गती मिळेल. विरोधक किंवा प्रतिस्पर्ध्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

**धनु**
आजचा दिवस आर्थिक दृष्टीने मजबूत राहील आणि व्यवसायात नवीन करार होतील. मालमत्तेचे व्यवहार करताना कागदपत्रांची पडताळणी करा, फसवणुकीची शक्यता आहे.

**मकर**
कामाच्या ठिकाणी तुमच्या कार्यशैलीचे कौतुक होईल आणि प्रगतीचे मार्ग मिळतील. खर्चावर योग्य नियंत्रण ठेवले नाही तर आर्थिक ओढताण होण्याची शक्यता आहे.

**कुंभ**
मुलांच्या संदर्भात आज तुम्हाला एखादा कठोर पण महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागेल. प्रभावशाली व्यक्तींच्या गाठीभेटीमुळे तुमच्या आत्मविश्वासात मोठी वाढ होईल. भावंडांच्या विवाहाचे प्रश्न सुटतील.

**मीन**
कामाचा ताण स्वतःवर हावी होऊ देऊ नका, अन्यथा आरोग्यावर परिणाम होईल. मुलांकडून चांगली बातमी मिळेल. प्रेमसंबंधातील जुने तणाव निवळतील. जोडीदाराशी जवळीक वाढेल.

# केडीएमसी निवडणूकीसाठी अधिकारी-कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षण वर्ग

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीचे मतदान दि.15 जानेवारी रोजी व मतमोजणी दि.16 जानेवारी रोजी होणार आहे. या निवडणूक प्रक्रियेचे कामकाज सुलभपणे पार पाडावे, याकरीता मतदान केंद्रावरील मतदान अधिकारी कर्मचारी (मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी-1,2,3) यांच्यासाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 करीता प्रत्यक्ष मतदान दिवसाच्या कर्तव्यासाठी सुमारे 9600 अधिकारी कर्मचारी वर्गास आदेश बजाविण्यात आले असून, मतदान अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी दि.27 व 28 डिसेंबर 2025 रोजी सकाळ व दुपारच्या सत्रात 1) बिर्ला वन्य, केडीएमटी इमारत, चौथा मजला, शहाड, 2) प्र.के.अत्रे रंगमंदिर, कल्याण (पश्चिम), 3) पाटकर शाळा, राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व) व 4) पेंढारकर कॉलेज, सावळाराम क्रीडा संकुलाच्या बाजूला, डोंबिवली (पूर्व) येथे निवडणूक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. याकरीता सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर नियोजन करण्यात येत आहे.

# ठाणे मनपा निवडणुकीसाठी मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (25) :** ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 साठी 15 जानेवारी 2026 रोजी होणारी मतदान प्रक्रिया बिनचूक पध्दतीने व्हावी, यासाठी मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या मतदान अधिकारी, कर्मचारी यांचे पहिले प्रशिक्षण शनिवारपासून होणार असल्याची माहिती निवडणूक अधिकारी तथा आयुक्त सौरभ राव यांनी दिली. मतदान केंद्रावर नियुक्तीचे आदेश प्राप्त झालेल्या सर्व अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण घेणे अनिवार्य असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

राज्य निवडणूक आयोगाने ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया जाहीर केली आहे. त्यानुसार ठाणे महानगरपालिकेच्या 33 प्रभागात 15 जानेवारी 2026 रोजी मतदान होणार आहे. मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी 1, 2, 3 यांना मतदान प्रक्रियेबाबत प्रथम प्रशिक्षण वर्ग दिनांक 27/12/2025 ते 29/12/2025 या तीन दिवसाच्या कालावधीत राम गणेश गडकरी रंगायतन व डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे दोन सत्रात आयोजित केले आहे.

ठाणे शहरात एकूण 2013 इतकी मतदान केंद्रे असून या सर्व मतदान केंद्रासाठी 10120 अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या निवडणूक विभागाच्यावतीने संपूर्ण प्रशिक्षणाचा कार्यक्रम आखला असून यासाठी एकूण 2530 पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकामधील एकूण 10120 अधिकारी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण होणार आहे.

राम गणेश गडकरी रंगायतन व डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे दिनांक 27 डिसेंबर ते 29 डिसेंबर या कालावधील सकाळी 9 ते 12 व दुपारी 2 ते 5 या दोन सत्रात एकूण 4520 अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. तर डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे एकूण 5600 अशा एकूण 10120 अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे निवडणूक उपायुक्त उमेश बिरारी यांनी नमूद केले.

# दहागाव येथे जीवनदीपच्या निवासी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**दहागाव** : विद्यार्थ्यांच्या कलागुणांबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा देखील विकास व्हायला हवा; आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो हे ध्यानात घेत जीवनदीप महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने सात दिवसीय निवासी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन केले आहे. गुरुवार दिनांक २५-१२-२०२५रोजी या श्रमसंस्कार शिबिराचा शुभारंभ हा जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात



आला. सदर उद्घाटन कार्यक्रमाला दहागाव व परिसरातील प्रतिष्ठित नागरिकांनी हजेरी लावली. अध्यक्ष रविंद्र घोडविंदे यांनी विद्यार्थ्यांना सदर शिबिरासाठी खूप शुभेच्छा दिल्या. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. महाविद्यालयाचे संचालक. प्रशांत घोडविंदे,प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे यांच्या मार्गदर्शनाने सदर शिबिर सात दिवस सुरू असणार आहे. NSS कार्यक्रम अधिकारी प्रा. दिनेश धनगर, NSS कार्यक्रम अधिकारी. धनश्री नाईक, व वरिष्ठ स्वयंसेवक या निवासी श्रमसंस्कार शिबिरात उपस्थित आहेत. गावांमध्ये वनराई बंधारे बांधणे, स्वच्छता राखणे, स्वच्छतेचे महत्व लोकांना पथनाट्यद्वारे विद्यार्थी समजावून सांगणार आहेत. सदर शिबिरामुळे विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त व पर्यायाने सुजान नागरिक घडण्यासाठी मदत होईल.

# भिवंडीत गुन्हे शाखेच्या पोलिसांची धडक कारवाई

## सुमारे एक लाख 20 हजार 600 रुपये किमंतीचा मुद्देमाल हस्तगत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : ठाणे जिल्ह्यात होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर आचारसंहिता दरम्यान कायदा व सुव्यवस्था चांगली रहावी व सार्वत्रिक निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस यंत्रणा सतर्क झाली असुन नियोजित कामकाजाला सुरवात झाली आहे. त्याअनुषंगाने भिवंडीत गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांचा विशेष पथकास मिळालेल्या गोपणीय माहितीच्या आधारे शांतीनगर परिसरात सापळा रचून केलेल्या कारवाईत गांजा या अमली पदार्थासह गावठी कट्टा व जिवंत काडतूस बाळगणाऱ्यास पोलीस पथकाने मोठ्या शिताफीने ताब्यात घेऊनअटक केली आहे. त्यांच्या कडून सुमारे एक लाख





20 हजार 600 रुपये किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरीफ सिध्दीकी (वय 19)असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भिवंडी गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी अमोल इंगळे यांस माहिती मिळाली कि एक संशयित युवक शांतीनगर भागात गांजा विक्री साठी येणार आहे त्यामुळे त्यांनी सदर माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक जनार्दन सोनवणे यांना देताच त्यांनी सपोनि श्रीराज माळी,सपोनि मिथुन भोईर,पोलीस उपनिरीक्षक रविंद्र पाटील,रामचंद्र जाधव,सपोउनि सुधाकर चौधरी, पोहवा निलेश बोरसे,प्रशांत राणे,सुदेश घाग,वसंत चौरे,वामन भोईर,अमोल इंगळे,विजय कुंभार,सर्फराज तडवी,महिला कर्मचारी अनुष्का पाटील माया डोंगरे पथकाने रात्री

### जिवंत काडतूस सह गावठी कट्टा बाळगणाऱ्यास अटक

शांतीनगर परिसरातील गायत्रीनगर परिसरात आझादनगर येथे सापळा रचून कारवाई केली .ज्यामध्ये संशयित आरीफ सिध्दीकी हा आला असता पोलिस पथकाने त्यास ताब्यात घेत त्याची झडती घेतली असता त्याच्या जवळ एक किलो ९०४ ग्रॅम वजनाचा गांजा,तसेच एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतुस असा एक लाख 20 हजार 600 रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करून सदर आरोपीलाअटक करण्यात आली आहे.

# उल्हासनगर : महापालिका निवडणुकीसाठी दोन दिवसांत ८८२ अर्जाचे वितरण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर :** महापालिका निवडणुकीत अर्ज दाखल करण्याच्या दोन दिवसांत एकही अर्ज दाखल झाला नाही. मात्र, दोन दिवसात ८८२ अर्जाचे वाटप झाल्याची माहिती सहायक आयुक्त गणेश शिंपी यांनी दिली. पाणी व मालमत्ता बिल यांचे ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी इच्छुकांनी गर्दी केली होती. मालमत्ता कर व पाणी बिल वसुली कोटीच्या घरात जाणार असल्याची माहिती कर विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली, तसेच घरी शौचालय असल्याच्या प्रमाणपत्रासाठीही इच्छुकांची मुख्य स्वच्छता निरीक्षक कार्यालयात रीघ लागली आहे.

# बी.एन.एन.महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याचा गौरव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी शहरातील सुप्रसिद्ध अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाच्या बी.एन. एन. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाने शैक्षणिक वर्ष २०२५ २६ मध्ये मुंबई विद्यापीठा च्यावतीने आयोजित विविध शिबिरांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून विविध पातळींवर यश संपादन करत यश मिळवले असुन मान्यवरांकडून महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्था पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे. मुंबई विद्यापीठाच्यावतीने आयोजित विविध शिबिरांमध्ये बी एन एन महाविद्यालयातील स्वयंसेवकांची निवड करण्यात आली आहे.

महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व विभागीय समन्वयक डॉ. आर एल रूपवते यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत आदर्श कार्यक्रम अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.तर ठाणे येथे जिल्हा न्यायाधीश व पोलिस आयुक्त यांच्या हस्ते त्यांना आदर्श नोडल ऑफिसर हा पुरस्कार झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या लीडरशिप कॅम्पसाठी महाविद्यालयातील स्वयंसेविका वंशिका नाईक, चांदनी शेख व मोहम्मद इसरार शहा यांची निवड झाली आहे. तर आव्हान कॅम्पसाठी मानसी झा हिची निवड पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे झाली आहे. याशिवाय मुंबई विद्यापीठाच्या उत्कर्ष कॅम्पमध्ये चांदनी शेख हिची निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शशिकांत म्हाळुंकर व सर्व प्राध्यापकामार्फत निवड झालेल्या स्वयंसेवकांचे व कार्यक्रम अधिकारी यांचे मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.





# पडघा ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी चंदा साळुंके

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा :** वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत आलेल्या व चांगले उत्पन्न असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी चंदा साळुंके यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.



मावळत्या उपसरपंच अलका मोरे यांनी आंपसात ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्याने हे पद रीक्त होते त्यानुसार सरपंच सायली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सभा पडघा ग्रामसचीवालय सभागृहात शुक्रवारी घेण्यात आली यावेळी उपसरपंच पदासाठी चंदा राजेश साळुंके यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक अध्यासी अधीकारी सायली पाटील यांनी त्यांची उपसरपंच पदावर बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले.यावेळी माजी सरपंच व विद्यमान सदस्य रवींद्र विशे, शैलेश बिडवी, माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य गिरीश जाधव, मयुरेश गंधे, नयना जाधव, वृषाली खिसमतराव, रश्मी तेलवणे, निता दास उपस्थित होते तर निवडणूक दरम्यान सचीव म्हणुन ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे यांनी काम पाहिले. चंदा साळुंके यांची उपसरपंच पदावर निवड होताच ठाणे जिल्हा मजुर फेडरेशनचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक पंडीत पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती अशोक शेरेकर, उपसभापती गुरूनाथ जाधव, भाजपा पडघा शहर अध्यक्ष उमेश शेरेकर, माजी सरपंच शशाक तांबोळी, राजेश साळुंके, अविनाश दास, संतोष घोलप, आदी मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# विसाच्या 'आविष्कार' संशोधन अधिवेशनात बिर्ला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची दैदिप्यमान कामगिरी





**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** मुंबई विद्यापीठ आयोजित २०व्या आविष्कार आंतरमहाविद्यालयीन संशोधन अधिवेशन २०२५ च्या अंतिम फेरीत कल्याण येथील बी. के. बिर्ला कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या संशोधनप्रधान परंपरेला नवा आयाम दिला .

या आंतरमहाविद्यालयीन संशोधन अधिवेशनात वाणिज्य पदव्युत्तर प्रवर्गातील कॅटगरी 2 मध्ये एम.एस्सी. एआय भाग–२ चे विद्यार्थी यश देवरुखकर आणि प्रसाद साबळे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले. या संशोधन कार्याचे मार्गदर्शन बी. के. बिर्ला कॉलेजचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. कल्पेश गायकवाड यांनी केले. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदव्युत्तर प्रवर्गातील कॅटगरी 5 मध्ये बी. के. बिर्ला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळवले. या विजयी संघामध्ये संस्कार गायकवाड, रुशिका खवास, दर्शना सिंग, रिंकी शर्मा आणि आदित्य नाईकवाडी यांचा समावेश असून या संशोधन कार्याचे मार्गदर्शन प्रा. राजेश्वरी मिस्त्री यांनी केले.

तसेच भौतिकशास्त्र विभागातील एम.एस्सी.चे विद्यार्थी सौरभ मोकाशी यांनी अंतिम फेरीत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवून महाविद्यालयाच्या यशात भर घातली. त्यांच्या संशोधन कार्याचे मार्गदर्शन डॉ. दत्तात्रय क्षीरसागर यांनी केले. या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना सहाय्यक प्राध्यापक प्रा. कल्पेश गायकवाड यांनी सांगितले की, "महाविद्यालयाचे व्यवस्थापन तसेच उच्चस्तरीय प्रशासन नेहमीच संशोधन संस्कृतीला सातत्याने प्रोत्साहन देत आहे. त्यांच्या सक्रिय सहकार्य आणि पाठबळाशिवाय असे यश शक्य झाले नसते." या उल्लेखनीय यशामुळे बी. के. बिर्ला कॉलेजने २०व्या आविष्कार संशोधन अधिवेशनात आपली संशोधनात्मक ओळख अधिक ठळकपणे अधोरेखित केली आहे.

# साहिबजादा जोरावर सिंग व साहिबजादा फतेह सिंग यांना महापालिकेतर्फे भावपूर्ण आदरांजली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : गुरु गोविंद सिंग यांचे पुत्र साहिबजादा जोरावर सिंग व साहिबजादा फतेह सिंग यांनी दिलेल्या बलिदानाच्या सन्मानार्थ आजचा दिवस "वीर बाल दिवस" म्हणून सर्वत्र ओळखला जातो. या वीर बाल दिनानिमित्त, महापालिका सचिव किशोर शेळके यांनी महापालिका मुख्यालयात ,साहिबजादा जोरावर सिंग व साहिबजादा फतेह सिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. या समयी उपस्थित माहिती व





जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सहा.माहिती व जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत, सुरक्षा अधिकारी भरत बुळे तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील साहिबजादा जोरावर सिंग व साहिबजादा फतेह सिंग यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून आदरांजली वाहिली.

# भिवंडी नि. शहर महानगरपालिकेचे स्वीप कक्षमार्फत मतदान जनजागृती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-2026 अंर्तगत मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी भिवंडी नि. शहर महानगरपालिकेचे स्वीप कक्षमार्फत मनपा शाळा क्र. 44 टेमघर याठिकाणी मा. आयुक्त अनमोल सागर व मा. अति. आयुक्त नयना ससाणे व स्वीप कक्षाचे नोडल अधिकारी श्रीकांत



परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक नोडल अधिकारी श्रीम. कल्पना तळपाडे व श्री. राहुल नाडेकर तसेच भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, शाळा क्र. 44, टेमघर, भिवंडी मुख्यध्यापीका. श्रीम. प्राजक्ता प्रदीप परब, सहशिक्षक श्री. प्रमोद सुर्यवंशी, इतर शाळेतील सहकारी शिक्षक, श्री. सत्यनारायण गोलापेल्ली, श्री. सुनिल बोंबेरे, श्री. राजेंद्र साळवे, श्री. संजय गोदके यांनी शाळांमधील मुलां/मुलींची रॅली टेमघर गावामध्ये काढुन नागरीकांना दि. 15 जानेवारी 2026 या दिवशी मतदानाला चला असे नारे देऊन नागरीकांमध्ये मतदानाची जनजागृती केली.

# ठाणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र वाटप

## दोन उमेदवारांचे अर्ज दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (26)** - ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज (26.12.2025) ठाणे शहरातील 9 प्रभागातून आज एकूण 1008 नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती प्रभागसमितीनिहाय नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.

तर कळवा प्रभाग समिती येथून नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टीच्या (शरदचंद्र पवार) पूजा राजेंद्र शिंदे व अभिजीत अंकुश पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी पाटील यांच्याकडे सादर केला.

दिनांक 23, 24, व 26 डिसेंबर 2025 या तीन दिवशी मिळून एकुण 3078 उमेदवारी अर्जाचे वाटप करण्यात आले.

प्रभागसमितीनिहाय आकडेवारी (प्रभाग क्रमांक 1,2,3,8) माजिवडा मानपाडा प्रभागसमिती - 113 (प्रभाग क्रमांक 4,5,7) वर्तकनगर प्रभागसमिती - 128 (प्रभाग क्रमांक 6,13,14,15) लोकमान्य सावरकर प्रभागसमिती - 146 (प्रभाग क्रमांक 16,17,18) वागळे प्रभागसमिती - 115 (प्रभाग क्रमांक 19,20,21,22) नौपाडा- कोपरी प्रभागसमिती – 94 (प्रभाग क्रमांक 10,11,12) उथळसर प्रभागसमिती - 44 (प्रभाग क्रमांक 9,23,24,25) कळवा प्रभागसमिती - 81 मुंब्रा प्रभागसमिती (प्रभाग क्रमांक 26,31, 30, 32) – 180 दिवा प्रभागसमिती (प्रभाग क्रमांक 27,28, 29, 33) – 107

# महाराष्ट्र गतका संघ चंदिगडसाठी रवाना



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : गतका फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित 28 ते 30 डिसेंबर चंदिगड मोहाली येथे स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ रवाना झाला आहे. या सीनियर स्पर्धेकरिता महाराष्ट्रातील तब्बल 23 खेळाडू सहभागी होत आहेत. त्यामध्ये 12 मुली आणि 11 मुले सहभाग घेणार आहेत. त्याचबरोबर संघव्यवस्थापक श्रीधर कमले आणि संघ प्रशिक्षक संस्थेचे सचिव प्रा. आरती चौधरी हे काम पाहणार असून मीडिया इन्चार्ज रोहन पवार काम पाहणार आहेत.

हा सर्व संघ चंदीगड करिता 26 डिसेंबरला रवाना झाला आहे. असोसिएशन ऑफ गतका महाराष्ट्र चे अध्यक्ष संतोष चौधरी, उपाध्यक्ष अश्विनी महांगडे, सचिव प्रा.आरती चौधरी, खजिनदार एड. सायली जाधव, सदस्य रवींद्र चौधरी, एड.मृण्मयी जाधव, अविनाश अनपट व सर्व जिल्हा प्रतिनिधी यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## केंद्रीय मंत्री ना.रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त रूग्णांना फळे वाटप!



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री ना. रामदासजी आठवले यांचा वाढदिवस महाराष्ट्रासह संपूर्ण देशात जल्लोषात व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

मुरबाड मध्येही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ)गटाच्या वतिने ना. रामदास आठवले यांचा वाढदिवस रिपाई पदाधिकाऱ्यांनी विविध उपक्रमांनी साजरा केला. यावेळी मुरबाड ग्रामीण रूग्णालयातील रूग्णांना व आरोग्य कर्मचाऱ्यांना फळे वाटप करण्यात आले. तत्पूर्वी रूग्णालयातील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष मेहबूबभाई पैठणकर, ठाणे जिल्हा ग्रामीण सरचिटणीस प्रा. शरदचंद्र सोनवणे, मुरबाड तालुका अध्यक्ष दिशेने उघडे, अन्याय अत्याचार निर्मुलन समितीचे आण्णा साळवे, रिपाई शहराध्यक्ष कैलास देसले, ता. उपाध्यक्ष रमेश देसले, ता. सरचिटणीस भुपेश साटपे,विद्यार्थी सेनेचे संतोष उघडे, लोकक्रांतीचे नरेश मोरे,विलास जाधव,मुकेश उबाळे, यांच्यासह रिपाईचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# वनविभागाच्या कारवाईने ४०० कुटुंबांचा प्रश्न ऐरणीवर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : मांडा-टिटवाळा पूर्वेकडील विद्यामंदिर शाळेजवळील रस्त्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, वनविभागाच्या कारवाईमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. या ठीकाणी नवश्री सिद्धीविनायक व सह्याद्री को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीलगत असलेला, सोसायटीत ये-जा करण्यासाठी वापरला जाणारा मुख्य रस्ता आज वनविभागाने बंद केला. ही कारवाई कल्याण वनपरिक्षेत्र अधिकारी आखाडे यांच्या निर्देशानुसार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.



विद्यामंदिर शाळेजवळ तसेच मांडा परिसरात सोसायटीच्या बाजूला लागून असलेली जागा वनविभागाच्या अखत्यारित येत असल्याने त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामे वाढत असल्याचा दावा वनविभागाकडून करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर वनजमिनीचे संरक्षण करण्याच्या कारणास्तव हा रस्ता बंद करण्याची कारवाई करण्यात आली. मात्र हा रस्ता केवळ सर्वसामान्य नागरिकांसाठीच नव्हे, तर संपूर्ण परिसरातील सुमारे ४०० हून अधिक कुटुंबांसाठी अत्यावश्यक असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

या रस्त्याद्वारेच सोसायटीमध्ये रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने, पाण्याचे टँकर तसेच महानगरपालिकेची कचरा संकलन करणारी वाहने ये-जा करीत होती. रस्ता अचानक बंद झाल्याने आपत्कालीन परिस्थितीत मोठा धोका निर्माण होऊ शकतो, अशी तीव्र चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे. एखादा रुग्ण गंभीर अवस्थेत असल्यास रुग्णवाहिका वेळेत पोहोचणार कशी? आगी सारखी एखादी दुर्घटना घडल्यास अग्निशमन दलाला मार्ग कसा मिळणार? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

या संदर्भात स्थानिक नागरिकांनी यापूर्वीच वनविभागाकडे लेखी अर्ज सादर केले असून, सदर अर्जांमध्ये रस्ता पूर्णपणे बंद न करता किमान वाहतुकीसाठी खुला ठेवावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या मते, वनजमिनीवर अनधिकृत बांधकाम रोखणे आवश्यक असले तरी त्यासाठी संपूर्ण रस्ता बंद करणे हा उपाय योग्य नाही. नियंत्रित पद्धतीने रस्ता खुला ठेवून अनधिकृत बांधकामांवर कारवाई करता येऊ शकते, असेही नागरिकांचे म्हणणे आहे.

### आपत्कालीन सेवांचा मार्गच खुंटला

दरम्यान, याबाबत बोलताना वन अधिकारी निलेश आखाडे यांनी स्पष्ट भूमिका मांडत सांगितले की, सदर जागा वनविभागाच्या अखत्यारित असून तेथे वाहनांसाठी रस्ता ठेवणे शक्य नाही. नागरिकांच्या मागणीचा विचार करता केवळ पादचाऱ्यांसाठी पायवाट ठेवली जाईल, मात्र वाहनांची ये-जा करण्यास परवानगी दिली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या भूमिकेमुळे नागरिकांमध्ये असंतोष वाढला असून, आपत्कालीन सेवांसाठी तरी विशेष व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

वनविभागाचा निर्णय आणि स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न यामुळे मांडा-टिटवाळा परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित सोसायट्यांचे अर्ज, रहिवाशांच्या तक्रारी आणि संभाव्य धोके लक्षात घेता प्रशासन यावर कोणता तोडगा काढते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## विश्व हिंदू परिषदेच्या वतीने आदिवासी बांधवांना ब्लँकेट वाटप





**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा विश्व हिंदू परिषदेच्या सहकार्याने पेण ,पाली, रोहा आणि खालापूर तालुक्यातील आदिवासी वाड्यावर म्हणजेच कातकरी समाज आणि ठाकूर समाज यांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

यावर्षी विश्व हिंदू परिषदेच्या वतीने एकूण 98 आदिवासी पाड्यांवर 5400 ब्लँकेटचे वितरण केले. कातकरी समाज हा अशिक्षित आणि गरीब असा समाज आहे, त्यांना विश्व हिंदू परिषद वेगवेगळ्या मार्गाने मदत करत असते. या पाड्यातील विद्यार्थ्यांना वह्या पेन पेन्सिल वगैरे सारखी स्टेशनरी वाटप करणे, दिवाळीमध्ये फराळाचे वाटप करणे, संक्रांतीच्या सणानिमित्त काही वाड्यांवर तिळगुळ देणे, हिवाळ्यामध्ये ब्लँकेटचे वाटप करणे, ज्या आदिवासी वाड्यांना मंदिरामध्ये मूर्तींची गरज असते तेथे मार्बलच्या मूर्ती पुरवणे, शिवाय लहान मुलांसाठी तसेच तरुण आणि वयस्कर व्यक्तींसाठी कपडे वाटप करणे इत्यादी मदत नियमितपणे केली जाते. विश्व हिंदू परिषदेला या कामामध्ये मदत करणारे मुख्य देणगीदार मुंबईचे विनोद भाई शहा आणि पराग भाई मेहता आहेत ते स्वतः येथे येऊन आपल्या हाताने जांभिवली वाडी, करंबेली वाडी, गागोदे वाडी, हेटवणेवाडी अशा एकूण आठ,वाड्यांवर ब्लँकेटचे वितरण केले. विश्व हिंदू परिषदेच्या पेण प्रखंडाने आणि कुलाबा प्रखंडाने या कार्याला विशेष सहकार्य केले.

## विद्यार्थ्यांनी पाठांतराऐवजी संकल्पना समजून घेण्यावर भर द्यावा : डॉ.मुश्ताक शेख

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ज्ञान संपादन करत असताना घोकंपट्टी केल्यास आकलनशक्ती कमी होते आणि सर्जनशीलता खुंटते म्हणून विद्यार्थ्यांनी संकल्पना समजून घेऊन अभ्यास करावा असे प्रतिपादन शिक्षण निरीक्षक, उत्तर विभाग, बृहन्मुंबई डॉ.मुश्ताक शेख यांनी केले.

घाटकोपर मधील श्रीमती. पी. एन. दोशी महाविद्यालयाचा ६६ वा वर्धापन दिन दि.२४ डिसेंबर रोजी उत्साहात साजरा झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.मुश्ताक शेख उपस्थित होते तर डॉ.अवनी मणियार यांची प्रमुख उपस्थिती कार्यक्रमास लाभली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. आशा मेनन यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला.

याप्रसंगी संस्थेच्या विश्वस्त श्रीमती. बिजल दोषी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले आणि पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांना तसेच सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शरद पालवे आणि प्रा. अजिता गोपाकुमार यांनी केले. श्रीमती. एस. टी.महाविद्यालयाच्या उपप्राचार्या सीतालक्ष्मी सुब्रमण्यम यांनी कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

# कलेने मानसिक ताणतणाव कमी होऊन ऊर्जा मिळते - सचिन सांगळे, उप आयुक्त ( शिक्षण )



### ठाणे महानगरपालिका शाळांतील मुलांनी सांस्कृतिक महोत्सवात दाखविले कलाविष्कार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : अभ्यासाबरोबर कला जोपासणे फार गरजेचे आहे. कलेने मानसिक ताणतणाव कमी होऊन नवीन ऊर्जा मिळते. नवीन मार्ग सापडतात. कार्यक्रम पाहून मला स्वतःचे बालपणीचे दिवस आठवले. असे उप आयुक्त (शिक्षक ) सचिन सांगळे यांनी सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना सांगितले.

ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाचे वतीने मध्यवर्ती सांस्कृतिक महोत्सव स्पर्धा मंगळवार दिनांक 23 व 24 डिसेंबर 2025 रोजी ठामपा उप आयुक्त (शिक्षण ) सचिन सांगळे, ठामपा प्रभारी शिक्षणाधिकारी शेषराव बडे, गट अधिकारी संगीता बामणे यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आल्या होत्या. या सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन उप आयुक्त (शिक्षक ) सचिन सांगळे यांचे शुभहस्ते दि.23 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11 वाजता ठाणे महानगरपालिका शाळा क्रमांक 23, किसन नगर, ठाणे येथे झाले. कार्यक्रमास सांस्कृतिक महोत्सवाच्या कार्याध्यक्ष सविता चौधरी व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

सलग दोन दिवस चालणाऱ्या या सांस्कृतिक महोत्सवांमध्ये नृत्य आणि नाट्य विभाग अशा दोन प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. सदर महोत्सवामध्ये इयत्ता पहिली ते पाचवी पूर्व प्राथमिक आणि इयत्ता सहावी ते आठवी उच्च प्राथमिक अशा दोन विभागांमध्ये नृत्य स्पर्धा तसेच इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांमध्ये नाट्य स्पर्धा घेण्यात आल्या. नृत्य विभागात इयत्ता पहिली ते पाचवीच्या 30 शाळा, इयत्ता सहावी ते आठवीच्या 46 शाळा, तर नाट्य विभागात 26 शाळा अशा एकूण 102 शाळांमधील एकूण 2000 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला होता. या स्पर्धा अनुक्रमे ठाणे मनपा शाळा क्रमांक 13, खोपट, ठाणे मनपा शाळा क्रमांक 23, किसन नगर, आणि ठाणे मनपा शिक्षण विभाग कार्यालय, तळमजला हॉल, विष्णू नगर, नौपाडा, ठाणे या ठिकाणी आयोजित करण्यात आल्या होत्या.

सांस्कृतिक कार्यक्रमातील स्पर्धेच्या सर्व कार्यक्रमाचे विभागवार परीक्षण करून नृत्य, नाटय विभागातून बक्षीस पात्र कार्यक्रम निवडण्यात आले. त्यामध्ये इ.1 ली ते 5 वी नृत्य स्पर्धेत ठामपा शाळा क्रमांक 53 ने प्रथम क्रमांक, शा.क्र 56, द्वितीय क्रमांक तर शा.क्र 64 ने तृतीय क्रमांक क्रमांक मिळविला. इ.6 वी ते 8 वी नृत्य स्पर्धांमध्ये शा.क्र 59 ने प्रथम क्रमांक,शा. क्र 18,द्वितीय क्रमांक तर शा.क्र 25 ने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच इ.1 ली ते 8 वी नाट्य स्पर्धेत शा.क्र 11 ने प्रथम क्रमांक, शा.क्र 14 द्वितीय क्रमांक व शा.क्र 6 ने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच विविध उत्तेजनार्थ क्रमांक काढण्यात आले आहे.

# भविष्यात लोकशाही टिकेल का?

## सर्वसामान्य जनतेला पडलेला प्रश्न- सी.आर.म्हात्रे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : लोकशाही ही केवळ शासनपद्धती नाही ती नागरिकांच्या अपेक्षांची आणि सहभागाची सामूहिक रचना आहे. मात्र जगभरात,आणि आपल्या देशातसुद्धा लोकशाही भविष्यात टिकेल का? हा प्रश्न केवळ बौद्धिक चर्चेपुरता राहिलेला नाहीतर सर्व सामान्य जनतेला पडलेला प्रश्न आहे असे प्रांजळ मत पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे.

मतदानाच्या दिवशी दिसणारी गर्दी,आणि निवडणुकीनंतर पसरलेली शांतता हा विरोधभास लोकशाहीच्या आरोग्याविषयी प्रश्न उपस्थित करतो. लोकशाही कमकुवत करण्यासाठी सत्ता केंद्रीकरण,आणि संस्थात्मक दुर्बलता हे मोठे कारण आहे. लोकशाहीची खरी शक्ती,स्वतंत्र संस्था,स्वायत्त माध्यमे, सक्षम न्यायव्यवस्थेत असते.परंतु सत्तेचे केंद्रीकरण वाढले की संस्थांची स्वायत्ता कमी होते,कायदे बनतात पण अंमलबजावणी सत्तेच्या सोयीप्रमाणे वळवली जाते. परिणामी नियमांचे राजीव(Rule of law) मागे पडून व्यक्तीचे राज्य पुढे येते,व्यक्तिपूजा बळावते. ही सर्वव्यवस्था लोकशाहीला आतून पोखरत असते अशी खंत ही व्यक्त केली आहे.

नागरिकांची उदासीनता हा लोकशाहीचा अदृश्य शत्रू आहे. लोकशाही ही केवळ निवडणुकी पुरती मर्यादित केली तर ती दुर्बल होते. प्रश्न विचारण्याच्या ऐवजी स्वीकार केला जातो. सहभागी होण्यापेक्षा मौन धारण केला जातो. आणि हक्काऐवजी कर्तव्याची विस्मृती होते.आणि उदासीनता वाढते. रस्ते,पाणी,आरोग्य, शिक्षण या सारख्या मूलभूत प्रश्नावर आंदोलने उभी राहू नये ही सत्तेला सर्वात सोयीची स्थिती ठरते. लोकशाहीत बाह्य शत्रूपेक्षा अंतर्गत निष्क्रियता अधिक घातक ठरते. माध्यमांचे बदलते रूप आणि सत्याचा संकोच खरे पाहता लोकशाहीचा चौथा स्तंभ ही व्यावसायिक स्पर्धेत उतरताना दिसतात, सत्य पुढे आणतांना त्यांना त्रास होतो.काही राजकीय कचाट्यात सापडतात.मात्र काही माध्यमे निर्भिडता बाळगतात. प्रश्ना ऐवजी प्रचार सत्या ऐवजी घोषणा काही ठिकाणी दिशाभूल ठरते. नागरिक संभ्रमित होताना दिसतात. माहितीचा पूर वाढला आहे. आणि विवेक कमी झाला आहे.हे लोकशाहीला धोक्याचे संकेत आहे अशी भीतीही व्यक्त केली आहे.

अर्थकारण विषमता आणि विकासाचा एकांगी अर्थ.विकासाची व्याख्या जर काहींच्या फायद्या पुरती मर्यादित राहिली तर लोकशाहीची मुळे कमकुवत होतात .वाढती आर्थिक विषमता नागरिकांमध्ये असंतोष पेरते रोजगार,पाणी आरोग्य ,शेती विकास या प्रश्नांपेक्षा घोषणाबाजीला पूर आलेला दिसतो.यामुळे दिवसेंदिवस लोकशाहीवरचा विश्वास दिवसेंदिवस कमी होत आहे. लोकशाही टिकली पाहिजे यासाठी हे अंधारदायी चित्र आपोआप उजळणारे नाही त्यासाठी जागरूक नागरिक तयार झाले पाहिजे. होय बा ही प्रवृती नाहीशी झाली पाहिजे ,प्रश्न विचारण्याची धमक निर्माण झाली पाहिजे.माहिती तपासली पाहिजे,जे घडत आहे ते योग्य,अयोग्य हे पाहिले पाहिजे. शांततेतून बाहेर पडले पाहिजे. संस्थांची स्वायतत्ता ,न्यायालये,निवडणूक यंत्रणा,लेखापरीक्षण,यांना संरक्षण दिले पाहिजे.माध्यमांची जबाबदारी,सत्याचा शोध घेणारी असावी,ते सार्वजनिक हित जोपासतील,स्थानिक स्वराज्य संस्थांचा सशक्तीकरण गाव ते शहर येथे विस्तारून सर्वांनीच निर्णय यामध्ये सहभागी झाले पाहिजे. राजकारणामध्ये नैतिकता जोपासली पाहिजे. कारण लोकशाही ही जागृत मतदार यामुळे जिवंत राहते असेही सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी सांगितले.

## राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त 'जागो ग्राहक जागो' पथनाट्याद्वारे जनजागृती



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**रायगड** : ग्राहकांचे सुरक्षिततेचा हक्क, माहिती मिळविण्याचा हक्क, निवडीचा हक्क, तक्रार निवारणाचा हक्क, बाजू ऐकून घेतली जाण्याचा हक्क तसेच ग्राहक शिक्षणाचा हक्क आदी हक्कांचे संरक्षण व संवर्धन व्हावे, यासाठी ग्राहकांनी जागरूक राहून शासनाला सहकार्य करावे, आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्यांची जाणीव ठेवावी, खरेदी करताना किंमत व गुणवत्तेची तपासणी करावी तसेच फसवणूक टाळण्यासाठी योग्य ठिकाणी तक्रार निवारणासाठी दाद मागावी, याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात आले. यावर्षी ग्राहक दिनानिमित्त "Efficient and Speedy Disposal through Digital Justice" ही संकल्पना निश्चित करण्यात आली होती.

त्याच अनुषंगाने जिल्हा पुरवठा कार्यालय, रायगड-अलिबाग, अन्न व औषध प्रशासन, पेण, वैध मापन विभाग, अलिबाग तसेच प्रिझम सामाजिक विकास संस्था, चेंढरे-अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २४ डिसेंबर रोजी अलिबाग समुद्रकिनारा व अलिबाग बस स्थानक येथे "जागो ग्राहक जागो" पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्यातून ग्राहकांच्या अधिकारांविषयी प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमास जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, रायगड-अलिबागचे मा. न्यायमूर्ती विजय जाधव, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीम. दिपाली ब्राम्हणकर, पुरवठा निरीक्षण अधिकारी हर्षल देशमुख, प्रिझम संस्थेच्या श्रीम. तपस्वी गोंधळी व सहकारी, पुरवठा शाखेचे कर्मचारी, सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, पेण, सहाय्यक नियंत्रक, वैध मापन विभाग तसेच बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून दिले सामाजिक संदेश

### मॉडेल शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन ठरले संस्मरणीय

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : दि ईस्ट कल्याण वेलफेअर सोसायटी संचलित मॉडेल इंग्लिश हायस्कूल शाळेचा यंदाचा ४२ वा वार्षिक स्नेह संमेलन सोहळा संस्मरणीय ठरला आहे. नव्याने नूतनीकरण केलेल्या सुसज्ज रंगमंचावर 'रंग तरंग' अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्य, संगीत, कलाविष्काराने उपस्थित श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतले. याच सुसज्ज रंगमंचावर 'मॉडेल कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स' महाविद्यालयाचाही 'झेप' हा सांस्कृतिक कार्यक्रम यंदा संपन्न झाला.

आयोजित कार्यक्रमाला संस्थेचे आधारस्तंभ भगवान भोईर, अध्यक्ष बी.जी.उन्नीथन, उपाध्यक्ष कैलास सुर्वे, सचिव आनंदन नायर, खजिनदार नरेंद्र सूर्यवंशी, निलेश शिंदे, सदस्य एस.एस.जोशी, एन.डी.बिऱ्हाडे, पी.जी. पी. नायर, महेश गायकवाड, दत्ता गायकवाड उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मॉडेल शाळेच्या नव्या संकेतस्थळाचे प्रकाशन करण्यात आले असून शाळेविषयी सर्व माहिती या संकेतस्थळावर प्राप्त होणार आहे. मॉडेल शाळेच्या संगीता तांबोळी यांच्या समवेत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शिरीन थॉमस गोंसालवेज, उप प्राचार्य राजाराम कदम, कार्यालयीन अधीक्षक कल्याणी आढारी, सर्व शिक्षक व कर्मचारी तसेच संस्थेच्या सर्व कार्यकारी मंडळाचे मोलाचे सहकार्य लाभले.



आयोजित संमेलनात शाळा महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाराष्ट्रासह देशाच्या संस्कृतीचे दर्शन विविध नृत्यांमधून विद्यार्थ्यांनी सादर केले. मॉडेल शाळा व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शिक्षणासह त्यांच्या कला गुणांनाही वाव दिला जातो. त्याअनुषंगाने विविध कार्यक्रम आम्ही आयोजित करतो. आम्हाला अभिमान असेल की आमचे विद्यार्थी भविष्यात शाळेचे नाव आणखीन मोठे करतील, असा विश्वास यावेळी शाळेचे समन्वयक सूर्यकांत तांबोळी यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024